प्रकरण पहिले

श्रीमती प्रेमलाताई चव्हाण–महिला नेतृत्त्व आणि राजकीय वारसा

प्रकरण पहिले

श्रीमती प्रेमलाताई चव्हाण–महिला नेतृत्त्व आणि राजकीय वारसा

भारतीय राजकीय व्यवस्थेत महिलांचा सहभाग अत्यल्प आहे. प्राचीन काळापासून ज्या महिलांना राजकीय पाठबळ मिळाले त्याच महिला राजकीय व्यवस्थेत आलेल्या दिसतात. त्याचबरोबर स्वकर्तृत्वावरही काही महिला पुढे आलेल्या दिसतात. श्रीमती प्रेमलाकाकी यांनाही आपले पती केंद्रियमंत्री ना. आनंदराव चव्हाण यांचा राजकीय वारसा मिळाला. त्यांच्या निधनानंतर त्यांनी हा वारसा पुढे चालवला असे असले तरी नेतृत्त्वगुण त्यांच्यात होते. त्यामुळेच त्या आपल्या राजकीय जीवनात यशस्वी झाल्या. आज चव्हाण कुटूंबाची काँग्रेसनिष्ठा खा.श्री. पृथ्वीराज चव्हाण चालवत आहेत.

''केंद्रियमंत्री ना. आनंदराव चव्हाण यांच्या १९६० ते १९७३ पर्यंतची राजकीय वाटचालीचा वारसा श्रीमती प्रेमलाकाकी यांना लाभला. त्यामुळे केंद्रियमंत्री आनंदराव चव्हाण यांची राजकीय, सामाजिक पार्श्वभूमी पहाणे आवश्यक आहे. याचबरोबर पुरूष प्रधान भारतातील स्त्रियांची राजकीय स्थिती, नेतृत्त्वाची संकल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे.

राजकीय, सामाजिक क्षेत्रात 'नेतृत्त्व' ही संकल्पना प्रचलीत आहे. ''संस्कृत धातू 'नि' पासून 'नेता' हा शब्द निर्माण झाला. 'नेता' या शब्दातून 'नेतृत्त्व' हा शब्द अस्तित्त्वात आला.''[१] 'नि' म्हणजे अनुयायांना पुढे नेणारा, त्यांचा विकास करणारा म्हणजे नेता. नेता हा आपल्या सहकाऱ्यांना प्रभावित करून त्यांना प्रोत्साहन देऊन निश्चित उद्देशाकडे घेऊन जाणारा असतो.

प्रकरण पहिले

'नेतृत्त्व' ही संकल्पना सर्वज्ञात आहे. प्राचीन काळापासून ही संकल्पना अस्तित्त्वात आहे. भारताच्या इतिहासात अनुवंशिक राजतंत्राबरोबरच स्वत:च्या पराक्रमाने राजवंश निर्माण करणारे अनेक राजकीय नेतृत्त्व अस्तित्त्वात होती. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातही अनेक राजकीय नेतृत्त्व उदयास आली. यामध्ये दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, लो. टिळक, म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, श्रीमती इंदिरा गांधी, श्री, राजीव गांधी इ. होत.

ज्यावेळी समाजाला पूर्वापार चालत आलेली रचना असमाधारकारक वाटते, समाजाला बदल हवा असतो त्यावेळी लोकांच्या अभिवृत्तीत परिस्थितीनुरूप बदल घडवून समाज अभंग राखण्यासाठी नेतृत्त्वाची गरज असते. नेतृत्त्व या संकल्पनेची व्याख्या आपण खालील प्रमाणे पहाणार आहोत.

''एखाद्या गटाचे विशिष्ट ध्येय प्राप्त करण्याच्या प्रयत्नांचे संघटन व दिग्दर्शन करण्याच्या हेतूने प्रेरित झालेले वर्तन म्हणजे नेतृत्व.''

- राज्यशास्त्र कोश.[२]

''एखाद्या उद्योगाच्या प्रयोजनाच्या प्राप्तीकरता समान प्रयत्नाद्वारा व्यक्तींना प्रेरित आणि प्रभावित करणे म्हणजे नेतृत्त्व.''

- सेक्लर हडसन.

''नेतृत्त्व हे तीन गोष्टीवर निर्भर असते – व्यक्ति, अनुयायी, परिस्थिती.''

- बर्नाड.[३]

कोणतीही संघटना किंवा समुहाचा उद्देश प्राप्त होण्यासाठी नेतृत्त्वाची आवश्यकता असते. थोडक्यात नेतृत्त्व ही पुढारी बनण्याची व कायम राहण्याची कला नसून पुढाकार घेण्याची कला आहे असे लॉइड यांचे मत आहे.

प्रकरण पहिले

"नेतृत्त्वाच्या ठिकाणी सर्वसामान्यांपेक्षा अधिक बुद्धिमत्ता, मर्मग्राही दृष्टी, उपक्रमशीलता, बहिर्मुखवृत्ती, दृढनिश्चय, आत्मविश्वास, समायोजन, कुशलता, विश्वासपात्रता, सहभागी होण्याची क्षमता, जोरदार प्रक्रिया क्षमता, चिवटपणा, इतरांच्या भावनांची कदर करण्याची वृत्ती, संघटनकौशल्य, योजकता, संयम, वक्तृत्व, विनोदबुद्धी इ. गुण असावे लागतात."[४] नेतृत्त्वसंपन्न व्यक्ती समुहाला निर्देश देते, आज्ञांकित करते अथवा प्रमुख म्हणून मार्गदर्शन करते. भारतीय समाजकारणात, राजकारणात उदयास आलेले स्त्री नेतृत्त्वाचा तसेच त्यांना लाभलेला राजकीय वारसा याचा आढावा पुढीलपम्राणे -

भारतीय संस्कृती ही पुरूष प्रधान संस्कृती आहे. हाच पगडा अजूनही आहे. भारतीय राजकीय व्यवस्थेत पुरूषांच्या प्रमाणात स्त्रियांचा सहभाग पूर्वीपासून कमी असलेला दिसतो. असे असले तरी वेदकाळापासून काही महिला राजकीय, सामाजिक कार्यात पुरूषांबरोबर सहभागी झाल्या असल्याचे दिसते. "कमलादेवी चट्टोपाध्याय यांच्या मते, ऋग्वेदात 'वाच' ही पहिली विद्वान श्रेष्ठ स्त्री असून त्याचबरोबर गंगादेवी, घोषा, जूहू, सूर्या, रात्री, शशी, अपाला अशा प्रख्यात व हुशार स्त्रिया होऊन गेल्या. प्राचीन काळी आर्य स्त्रिया या धार्मिक वादविवाद व चर्चा यामध्ये भाग घेत असत. गार्गी, मैत्रीयी, उभयभारतीय, लोपमुद्रा, रोमेश इ. स्त्रियांचा उल्लेख करता येईल."[५]

"१२ व्या शतकात गुजरातमध्ये राणी नाईकदेवी, तेजपालची पत्नी अनुपमा, काश्मिरची लल्लदेवी, तेलगू कवयत्री मोल्ला या कर्तृत्त्ववान स्त्रिया, ओरिसातील माधवी, बंगालमधील चंद्रावती, महाराष्ट्रातील कवयत्री महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई या स्त्रिया भारतात होऊन गेल्या."[६] यावरून असे म्हणता येईल की, प्राचीन काळात ज्या महिलांना योग्य परिस्थिती व मार्गदर्शन मिळाले त्या महिला राजकीय सामाजिक व्यवस्थेत पुढे आल्या. परंतु सर्वसामान्य स्त्रिया तेंव्हाही या क्षेत्रपासून वंचित होत्या.

"महाराष्ट्रातील १७व्या, १८व्या शतकातील स्त्री जीवनाचा येथे विचार करणे क्रमप्राप्त ठरते. शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई यांचा उल्लेख मराठीशाहीतील पहिली राजकारणी स्त्री म्हणून करावा लागेल. शिवाजी महाराज स्वारीवर गेल्यानंतर जिजामातेने राज्यकारभाराची धुरा सांभाळली. महाराष्ट्रातील हे पहिले महिला नेतृत्त्व म्हंटले तर ते चुकीचे ठरणार नाही."[७] याशिवाय महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक महिला नेतृत्त्वाचा उदय झाला आहे. यामध्ये गोपिकाबाई, येसूबाई, ताराबाई,आनंदीबाई, अहिल्याबाई रांगणेकर, मृणाल गोरे, यशोदाबाई भट, प्रेमाबाई कंटक, गोदावरी परूळेकर, शांताबाई मुखर्जी, प्रमिलाताई दंडवते, विद्यमान राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, प्रभा राव, खा. श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण, ताराबाई मोडक, अनुताई वाघ, अनुताई लिमये इ. महिला नेतृत्त्वाचा राजकीय व्यवस्थेत सक्रिय सहभाग होता.

स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा राजकीय सहभाग :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत पुरूषांबरोबर महिलांचेही मोठे योगदान होते. यामुळे भारतीय स्त्रियांना स्त्री-स्वातंत्र्यासाठी पुन्हा संघर्ष करावा लागला नाही. इंग्लंडमध्ये स्त्रियांना राजकीय हक्कासाठी दोन शतके संघर्ष करावा लागला तसा संघर्ष भारतीय स्त्रियांनी केला नाही. कारण "स्वातंत्र्यलढ्यात राणी लक्ष्मीबाई, राणी चेन्नमा यासारख्या अनेक शूर स्त्रियांनी ब्रिटीश सत्तेशी लढा दिला तर सरोजीनी नायडू, अरूणा असफअली, उषा मेहता यासारख्या स्त्रियांनी म. गांधीजीच्या सत्य, अहिंसा मार्गाने ब्रिटीश सत्तेला हतबल केले. राणी लक्ष्मीबाईंचा आदर्श समोर ठेवून अनेक भारतीय स्त्रियांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ब्रिटीश सत्तेशी लढा दिला."[८] स्वातंत्र्य प्राप्तीच्या लढ्यातील स्त्रियांच्या कर्तबगारीमुळे भारतात स्त्रियांचा राजकीय सहभाग झाला. त्याचबरोबर स्त्रियांच्यात राजकीय जागृती आणि जाणीव झाली.

प्रकरण पहिले

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महिलांचा सहभाग :

ब्रिटीश काळात ब्रिटीशांनी त्यांच्या सोयीनुसार राज्याची विभागणी केली होती. स्वतंत्र भारतात १९५५ मध्ये सर्वत्र भाषिक राज्ये अस्तित्त्वात आली. गुजरात व महाराष्ट्र मिळून द्विभाषिक राज्याची निर्मिती झाली. मुंबईसह महाराष्ट्र अशी मागणी महाराष्ट्राची होती. यासंदर्भात सुंदराबाई भोपटकर यांच्या नेतृत्त्वाखाली स्त्रियांचा विरोध एका पत्रकातून दर्शविण्यात आला. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होण्यासाठी स्त्रियांनी ठिकठिकाणी सभा आयोजित केल्या, मोर्चे काढले, घोषणा दिल्या, सत्याग्रह केले. या आंदोलनात प्रामुख्याने अनुताई लिमये, शांता गोखले, सौ. तानुबाई लोहार, सौ. गंगू सपाटे, सौ. सोनूबाई पाटील इ. महिलांचा सक्रिय सहभाग होता.

स्वातंत्र्योत्तर काळातही स्त्रियांनी अनेक राजकीय चळवळीत सहभाग घेतला. यामध्ये "१९५६ ते १९६० या काळातील संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवामुक्ती संग्राम,१९७३-७४ मधील गुजरातमधील नवनिर्माण आंदोलन, हिमालयाच्या डोंगराळ गढवाल प्रदेशातील सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्त्वाखालील चिपको आंदोलन इ. आंदोलनात स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता."[९] यावरून भारतीय महिलांचा राजकीय सहभाग असलेला दिसून येतो.

१८व्या शतकापर्यंत जगातील कोणत्याही राष्ट्रात स्त्रियांना कायदेशीरदृष्ट्या राजकीय अधिकार नव्हते. "इंग्लंडमध्ये १८६० मध्ये स्त्रियांना पुरूषांबरोबर मताचा हक्क मिळावा या उद्देशाने तिथे सफ्रेजिस्ट चळवळ सुरू झाली. १९०५ ते १९१३ या काळात पुन्हा आक्रमक जोमाने सिल्हिया पॅरवर्स्ट हिच्या नेतृत्त्वाखाली सफ्रेजिस्ट चळवळ सुरू झाली."[१०] स्त्रियांना मताधिकार मिळाला पाहिजे हा जगातील एक ज्वलंत प्रश्न होता. यामुळे "१९१७ साली स्पिकर्स कॉन्फरन्सने एकमताने स्त्रियांच्या मताधिकारास मान्यता दिली."[११]

भारतातील स्त्रियांना राजकीय हक्कासाठी संघर्ष करावा लागला नाही. कारण भारतात ज्या चळवळी झाल्या त्या चळवळीत महिलांचा सक्रीय सहभाग होता. ''भारतात १९१९ च्या मॉटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायद्यानुसार स्त्रियांना मतदानाचा राजकीय हक्क देण्यात आला.''[१२] या कायद्यामुळे भारतातील १० लाख स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. ''१९३२ मध्ये मद्रासच्या कायदेमंडळात मथ्थुलक्ष्मी रेड्डी यांनी प्रथम स्त्री प्रतिनिधित्व मिळाले. तसेच त्यांची सभागृहाच्या उपसभापतीपदी निवड झाली होती. कमलादेवी चट्टोपाध्याय, राधाबाई सुब्बाराय, रेणूका रॉय, अम्मू स्वामीनाथन या स्त्रियांनी मध्यवर्ती कायदेमंडळात प्रतिनिधीत्व मिळविले.''[१३] स्वतंत्र भारताच्या घटना निर्मितीच्या समितीमध्ये सरोजीनी नायडू, दुर्गा देशमुख, रेणुका रे, हंसा मेहता यांनी उल्लेखनीय कार्य केले.

भारतीय राजकीय, सामाजिक व्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले. स्त्रियांवर असलेल्या बंधनामुळे त्या पुढे येऊ शकल्या नाहीत. १९ व २०व्या शतकात स्त्रियांचा सामाजिक, राजकीय विकास करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी आणि राजकीय नेत्यांनी बहुमोल स्वरूपाचे कार्य केले आहे. या स्त्री सुधारणेच्या कार्यामध्ये पंडित ईश्वरचंद्र विद्यसागर, दयानंद सरस्वती, दलपतराय लक्ष्मीशंकर, उमियाशंकर, लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, न्या, महादेव गोविद रानडे, पंडिता रमाबाई, गोपाळ गणेश आगरकर, जगनाथ शंकर शेठ, म. जोतिबा फुले, महर्षी धांडो केशव कर्वे, गोपाळ कृष्ण देवधर, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे इ. समाजसुधारक मंडळीनी सहभाग घेतला.

भारतीय राज्यघटनेच्या कलम १४, १५ व १६ या कलमानुसार कायदेशीररित्या स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समानतेचा अधिकार मिळाला आहे. कलम ३२५ व ३२६ नुसार स्त्री-पुरुषांना प्रौढ मताधिकाराचा समान अधिकार देण्यात आलेला आहे. असे असले तरी भारतीय स्त्रियांचा राजकीय सहभाग कमी असल्याचे

दिसते. राज्यघटनेच्या ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार स्त्रियांना स्थानिक राजकीय व्यवस्थेत सहभागी होण्यासाठी ३३ टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे.

भारतीय महिलांचे राजकीय व्यवस्थेत सहभाग कमी असण्याचे काही कारणे सांगितली जातात.

१. विशिष्ट राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी असल्यामुळे त्या स्त्रियांना उमेदवार म्हणून निवडणुका लढविणे शक्य झाले.

२. कुटूंबातील काही सदस्य राजकारणात सहभागी असल्यामुळे तसेच स्त्रियांच्या चळवळीच्या प्रभावामुळे स्त्री प्रतिनिधीना उमेदवार म्हणून वाव दिला गेला.

३. विशिष्ट जात, धर्म आणि वर्ग यांच्या आधारावर स्त्री उमेदवारांना संधी दिली गेली.

वरील कारणामुळे काही स्त्रिया राजकारणात आल्या. त्यांना संसदेत प्रतिनिधीत्व देऊन बोलण्याचा अधिकार दिला. अनेक राजकीय महिला नेतृत्व उदयास आली. त्यांनी आपल्या समस्या, समाजाच्या समस्या विधेयकाच्या रूपाने संसदेत मांडल्या. कांही महिलांनी कायदेनिर्मितीच्या कार्यात भाग घेतला यामध्ये –

''राजकुमारी अमृत कौर , सुचेता कृपलानी, रेणू चक्रवर्ती, राधा कुमूद मुखर्जी, लक्ष्मी एन मेनन, सुशीला गोपालन, उमा नेहरू, सीता परमानंद, दुर्गाबाई देशमुख, मणीबेन वल्लभभाई पटेल, सुषमा सेन, इंदिरा गांधी, इंदिरा ए. मायदेव, सुभद्रा जोशी, पार्वती कृष्णन, रेणुका रे, के. भारती तारकेश्वरी सिन्हा, व्हायोलेट अल्वा, सावित्री लिगम, ईला पॉन चौधरी, बेगम किडवई, मैमुना सुलतान, चपलकाता भट्टाचार्य, अनुसयाबाई काळे, सीता युधवीर, अनिस किडवई,सुशीला नायर, जयाबेन वजुभाई शहा, नंदिनी सत्पथी, यशोदा रेड्डी, कमला चौधरी, सुशीला रोहटगी, प्रतिभा सिंग, मुकूल बॅनजी, मृणाल गोरे, चंद्रावर्ती लखनपाल, मागरिट आल्वा, गीता

मुखर्जी, कु. सरोज खापर्डे, उमा दीक्षित, ताराबाई सप्रे, ताराबाई साठे, शकुंतला परांजपे, प्रमिला दंडवते, कुसूम कृष्णमूर्ती, श्रीमती प्रेमलाताई चव्हाण, मनेका गांधी, शीला कौल, नजमा हेपतुल्ला, रेणूका चौधरी, विजयाराजे शिंदे, ममता बॅनर्जी, सुषमा स्वराज्य इ. महिला प्रतिनिधीनी संसदेत विधेयके मांडली तसेच चर्चेत सहभाग घेतला.''[१४]

अशा पद्धतीने भारतीय राजकीय व्यवस्थेत अनेक महिला राजकीय नेतृत्त्व पुढे आली. खा. श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांना जरी राजकीय पार्श्वभूमी असली तरी नेतृत्त्व करण्याचे गुण मुळातच त्यांच्यात होते. श्रीमती प्रेमलाकाकी यांनी १९७३ ते १९९१ पर्यंत यशस्वी राजकीय कार्ये केली. त्यांनी कोणत्याही मंत्रीपदाची अपेक्षा न करता एकनिष्ठेने पक्षकार्य केले. ना. आनंदराव चव्हाण यांच्या राजकीय वारसा त्यांना लाभला. केंद्रियमंत्री आनंदराव चव्हाण यांनी १९६० पासून १९७३ पर्यंत एकनिष्ठेने पक्षकार्य केले. कोणतेही नेतृत्त्व घडत असताना त्याला बाजूच्या परिस्थितीबरोबरच नेतृत्त्व कौशल्याची ही आवश्यकता असते आणि हे नेतृत्त्व गुण या दोन्ही काँग्रेसनिष्ठ नेत्यामध्ये ततोतंत भरलेले होते.

पश्चिम महाराष्ट्रातील चव्हाण कुटूंबाची काँग्रेसनिष्ठा आणि पक्षनिष्ठा राजकीय जगतात वाखाणण्यासारखी आहे. आजही त्यांचे सुपूत्र खा.पृथ्वीराज चव्हाण पंतप्रधान कार्यालयाचे राजयमंत्री म्हणून कार्यरत आहेत. राजकीय जीवनात कोणतीही सत्ता, अभिलाषा, लोभ न धरता ना.आनंदरावकाका यांनी कार्य केले. अशा नेतृत्त्वाचा परिचय घेणे येथे आवश्यक आहे. त्यांच्या राजकीय जीवनातूनच खा. श्रीमती प्रेमलाकाकी यांनी आपल्या राजकीय नेतृत्त्वाचा व जीवनाचा पाया घातला आहे. त्यामुळे श्री. आनंदराव चव्हाण यांच्या नेतृत्त्वाची पार्श्वभूमी पहाणे आवश्यक आहे.

प्रकरण पहिले

केंद्रियमंत्री कै.आनंदराव चव्हाण यांचा जीवनपरिचय :

जन्म, बालपण, शिक्षण व विवाह :

भारतीय राजकीय व्यवस्थेत अनेकविध राजकीय नेतृत्त्व उदयास आलेली आहेत. कोणताही राजकीय वारसा नसताना समाजात राजकीय नेतृत्त्व उदयास येणे ही बाब विलक्षण आहे. नेतृत्त्व औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन पद्धतीचे असते.

ना.कै. दाजीसाहेब उर्फ आनंदराव रामराव चव्हाण हे एक अनौपचारिक किंवा कार्यात्मक स्वरूपाचे नेतृत्त्व होते. हे नेतृत्त्व मराठी बहुजन समाजातील शेतकरी कुटूंबात घडले. त्यांचा जन्म २१ ऑगस्ट, १९१४ रोजी पाटण तालुक्यातील कुंभारगाव येथे झाला. ''कुंभारगाव पाटण तालुक्यातील डोंगराळ भागात वसलेले मोठे गाव आहे. आनंदराव चव्हाण यांच्या नेतृत्त्वामुळे पाटण तालुक्यात वसलेले कुंभारगाव लौकीक अर्थाने देशात मोठे झाले.''[१५] ना.कै. आनंदराव चव्हाण यांना संपूर्ण महाराष्ट्र 'काका' म्हणून ओळखत असत. पाटण तालुक्यातील एका शेतकऱ्याचा मुलगा एम्.ए.,एल्एल्.बी. होतो हे पाटण तालुक्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलानाच नव्हे तर देशातील सामान्यांच्या मुलांना स्फूर्ती देणारी घटना आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेसनिष्ठ चव्हाण कुटूंबाचा आलेख पहाणे आवश्यक आहे. तो खालीलप्रमाणे –



ना.कै. आनंदरावकाका यांचे वडील शेतीच करत होते. घरची परिस्थिती साधारण होती. काही शेती वाट्याने दिली होती. पूर्वी गावात गावपंचायत असायची, पंचायतीकडून गावातील तंटे सोडविले जायचे. न्यायनिवाडा करण्यासाठी गावातील वरिष्ठ लोकांना पंच म्हणून निवडत असत. अशा पंचमंडळीत आनंदरावकाकांचे वडील असत. पूर्वी सर्रास घरात घोषा पद्धती होती. घोषा पद्धती म्हणजे स्त्रियांना घराबाहेर पडण्यास समाजाचे बंधन होते. अशी पद्धत तत्कालीन भारतीय समाजात रूढ होती. तशाच प्रकारची घोषा पद्धती आनंदरावकाकांच्या घरातही होती.

ना.कै. आनंदरावकाका यांना ४ बहिणी होत्या. मोठी बहिण काशीबाई पाटणकर घराण्यांत, दुसरी हौसाबाई कडेपूरमध्ये संपतराव देशमुख घराण्यात, तिसऱ्या दुर्गाबाई घाटगेघराण्यात तर हिराबाई यांना नागपूरमध्ये माने घराण्यात दिल्या आहेत. त्यावेळीसुद्धा मुली नागपूरपर्यंत देण्याची प्रथा कुंभारगावात होती. त्यांना एक भाऊ अण्णासाहेब म्हणून होते. दाजीसाहेबांचे टोपन नाव आनंदराव होते. संपूर्ण महाराष्ट्र त्यांना आनंदरावकाका म्हणूनच ओळखत असे.

ना. आनंदरावकाका यांची जन्मभूमी पाटण तर कर्मभूमी कराड तालुका ही होती. कृष्णा नदीने वाहताना केवळ आपले दोन्ही काठच सुपीक केले नाहीत तर

सुपीक माणसेही दिली. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून ते आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि त्यानंतर ही सातारा जिल्ह्यातील महनीय व्यक्तींचे महत्त्व अधिक आहे. यामध्ये प्रामुख्याने श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. यशवंतराव मोहिते, ना.श्री. आनंदराव चव्हाण, श्री. बाळासाहेब देसाई इ. व्यक्तींचा उल्लेख करावा लागेल. ना. आनंदराव चव्हाण यांचे बालपण ही कुंभारगावातच गेले. त्यांची शैक्षणिक वाटचाल खालीलप्रमाणे दिली आहे.

शैक्षणिक वाटचाल :

ना. केंद्रियमंत्री कै. आनंदराव चव्हाण यांचे प्राथमिक शिक्षण कुंभारगावमध्ये झाले. घरची परिस्थिती जेमतेम होती. शिक्षणाची आस त्यांना होती. त्यामुळे शिक्षण घेत असताना कोणत्याही अडचणीना सामोरे जाण्याची त्यांची तयारी होती. जन्मत:च हुशार, तल्लक बुद्धिमत्ता, विद्वत्ता कुशल असणाऱ्या व्यक्तींना अशा समस्या शिक्षणापासून वंचित ठेवू शकत नाहीत. ''त्यांनी माध्यमिक शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल, सातारा येथे घेतले. महाविद्यालयीन एम्.ए. पर्यंतचे शिक्षण राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे घेतले. त्यांनी एल्एल्.बी. ची पदवी साईक्स लॉ कॉलेज, कोल्हापूर येथे घेतली.''[१७]

उच्च महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना अनेक अडचणीना त्यांना सामोरे जावे लागले. यावेळी अनेक नातलगांनी त्यांना आर्थिक व अन्य स्वरूपाची मदत केली. ''शिक्षणासाठी बरीच वर्षे कोल्हापूरमध्ये होते. यावेळी बाबूराव डूबल या त्यांच्या नातलगांनी त्यांची जेवणाची सोय केली होती.''[१८] कधीकधी परीक्षेची फी भरण्यासाठी सुद्धा पैसे नसत. त्या-त्या वेळी नातेवाईकांनी त्यांना आर्थिक मदत केली. त्यांचे थोरले बंधूही त्यांना आर्थिक मदत करत असत. अशा खडतर परिस्थितीतून आनंदरावकाका यांनी आपले एम्.ए., एल्एल्.बी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. ना. आनंदराव चव्हाण, इंदूर संस्थानामध्ये होळकर महाराजांचे सचिव म्हणून

कार्यरत होते. तेव्हा त्यांनी मुंबई विद्यापीठातून एल्एल्.एम्. ही पदवी घेतली. ही परीक्षा त्यांनी मुंबई विद्यापीठातून दिली. त्यावेळी मुंबई विद्यापीठात मुंबई प्रांत, सिंधकराची, गुजरात, म्हैसूर, महाराष्ट्र इ. प्रदेश होते. ''ना. आनंदराव चव्हाण हे कोल्हापूरचे पहिले एल्एल्.एम्. पास होणारे विद्यार्थी होत.''[१९]

शिक्षण घेत असताना येणाऱ्या अडीअडचणीची जाणीव आनंदराव काकांना होती. बहुजन समाजातील सामान्य कुटूंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी किती धडपड करावी लागते हे त्यांनी जवळून पाहिले होते. म्हणून पुढील आयुष्यात आनंदराव काकांनी आपल्याकडे आलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांना विनासहाय्य परत पाठविले नाही. ''त्यांनी आपल्या घरासमोर गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मदत मिळेल असा बोर्डच लावलेला होता.''[२०] त्याप्रमाणे त्यांनी होतकरू विद्यार्थ्यांना मदत केली. त्यांना योग्य मार्गदर्शन केले.

''कायद्याप्रमाणे वाङ्मय, इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इ. विषयांचा आनंदरावकाकांचा व्यासंग होता.''[२१] आपल्या विनयशील, सुसंस्कृत वर्तनाने त्यांनी आपल्या विद्यार्थी दशेतही अनेक स्नेहमंडळी जमवली. यावेळी ते अनेक अभ्यासमंडळात सहभागी होत असत. आपली वैचारीक भूमिका त्यातून ते समर्थपणे मांडत असत. स्पष्ट बोलण्याचा आणि एखाद्या गोष्टीचे योग्य समर्थन करण्याचे कौशल्य त्यांच्याकडे होते. कदाचित यामुळेच भावी जीवनात ते संसदपटू झाले.

१९४१ साली आनंदरावकाका कोल्हापूर संस्थानात महाराणी ताराबाई यांचे सेक्रेटरी म्हणून कार्यरत होते. महाराणी ताराबाई यांनी आनंदराव चव्हाण आणि प्रेमलाकाकी यांचा विवाह आपल्या नविन राजवाड्यावर करून दिला. आपण शिकलेल्या मुलीशीच लग्न करणार या हट्टासाने काकांनी प्रेमलाकाकींशी १९४२ मध्ये विवाह केला. प्रेमलाकाकी या मुळच्या कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळच्या. परंतु वडिल बडोदा येथे असल्याने त्यांचे शिक्षण बडोद्यामध्ये झाले. त्यावेळी त्या सिनियर

केंब्रिज होत्या. पुढील वैवाहिक आयुष्यात प्रेमलाताईंनी आनंदरावकाकांना मोलाची साथ दिली.

"आनंदराव चव्हाण यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. त्यांनी जनतेचे नेतृत्त्व केले. या नेतृत्त्वगुणामुळेच त्यांची १९४२ मध्ये लोकल बोर्डमध्ये निवड झाली."[२२] १९५० मध्ये शेकाप मध्ये त्यांनी प्रवेश केला. यावेळी पाटण मामलेदार कचेरीवर मोर्चा काढण्यात आला. या मोर्च्यात ते सहभागी झाले. हे त्यांच्या राजकीय जीवनातील पहिले पाऊल होते असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही.

१९४२ मध्ये आनंदरावकाका यांनी जिल्हा लोकल बोर्डची निवडणूक कुंभारगाव येथून बाळासाहेब देसाई यांचे विरोधात लढवली. परंतु बाळासाहेब देसाई हे २ मतांनी विजयी झाले. श्री. बाळासाहेब देसाई जिल्हा लोकल बोर्डचे अध्यक्ष झाले. श्री. आनंदराव चव्हाण जिल्हा लोकल बोर्डचे सभासद म्हणून कार्यरत राहिले. याच दरम्यान दुसऱ्या महायुद्धाची सुरूवात झाली होती. "दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आनंदरावकाकांचे इंडियन आर्मीत किंग्स कमिशनवर कॅप्टन म्हणून निवड झाली ते १९४४ पर्यंत या पदावर कार्यरत होते." "किंग्स कमिशनद्वारा त्यांची नेमणूक मध्यप्रदेशातील महू या ठिकाणी झाली होती."[२३]

दुसरे महायुद्ध संपले आणि किंग्स कमिशन बरखास्त करण्यात आली. १९४४ मध्ये त्यांनी इंदूर संस्थानात नोकरी करावयाचे ठरविले. इंदूर संस्थानामध्ये तुकोजी होळकर यांच्या सेवेत ते सेक्रेटरी म्हणून कार्यरत होते. "इंदूर संस्थानची लिखित स्वरूपात राज्यघटना निर्मितीचे कार्य आनंदराव चव्हाण यांनी केले."[२४] या संस्थानामध्ये कार्यरत असताना आनंदराव काका यांनी एल्एल्.एम्. ही कायद्याची पदवी घेतली.

१९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील संस्थाने विलिनीकरणाचे कार्य सुरू झाले. त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल हे

तत्कालीन भारताचे गृहमंत्री होते. ते संस्थान विलिनीकरणासंदर्भात इंदूरला आले. परंतु त्याचवेळी इंदूर संस्थानचे महाराज तुकोजी होळकर हे अमेरिकेला गेले होते. ''प्रसंगी महाराजांचे सेक्रेटरी या नात्याने महाराजांच्यावतीने संस्थानासंदर्भात बोलणी करण्याचा योग आनंदरावकाकांना आला.''[२५] याच प्रेरणेने ते इंदूरहून १९५० मध्ये कराडला आले. सातारा, सांगली, कोल्हापूर येथे वकीली सुरू केली. ''वकिलीच्या व्यवसायापासून गोरगरीबाचे प्रश्न सोडविण्याचे कार्य केले. कोणताही खटला सोडवत असताना लोकांच्याकडून ते नाममात्र शुल्क घेत असत.''[२६]

केंद्रियमंत्री ना. डी.आर. चव्हाण ऊर्फ आनंदराव चव्हाण हे सातारा जिल्ह्यातील एक विद्वत्तापूर्ण, निष्णात वकील होते. ''वकिलीमुळे सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात त्यांचे नाव अल्पावधीत सर्वतोमुखी झाले. या दोन जिल्ह्यात गाजलेले बरेचसे फौजदारी खटले आनंदराव यांनी चालविले.''[२७] ना. आनंदरावकाका यांनी आपल्या बुद्धिमत्तेचा, शिक्षणाचा, संपत्तीचा कधीही गर्व केला नाही. त्यांचे इंग्लिश, मराठी, हिंदी भाषेवर प्रभुत्व होते. ''कायद्याचा सखोल अभ्यास, विनम्र स्वभाव यामुळे ते वकीली व्यवसायात यशस्वी झाले.''[२८]

ना. आनंदरावकाका १९४४-४८ मध्ये इंदूर संस्थानचे महाराज तुकोजी होळकर यांच्या सेवेत कार्यरत होते. १९५० मध्ये ते स्वगृही परतले, वकिली व्यवसाय सुरू केला. ना. आनंदरावकाका सामान्यांचे वकिल म्हणून समाजाची सेवा करू लागले. अत्यंत अवघड व गुंतागुंतीचे खटले चालवून ते यशस्वी केले आणि त्यातून सामान्य लोकांची अस्मिता जागृत केली. केवळ पैशासाठी वकिली केली असती तर ते शेवटपर्यंत वकीलच राहिले असते. त्यांचा वकिलीमागचा हेतू उदात्त होता. सकारात्मक होता. यामुळे ''आमचे वकील, गोरगरीबांचे वकील म्हणून त्यांनी सामान्य लोकांमध्ये स्थान मिळविले.''[२९] ना. आनंदरावकाका म्हणतात की, ''पक्षकाराकडे येणे असलेली रक्कम वसूल करावयाचे ठरविले तर रूपये

५०,०००/- होतील पण येणे-बाकी वसूल करण्यासाठी मी काही सावकार नाही. मला त्यांच्याकडून प्रेम वसूल करावयाचे आहे.''[३०] अशा प्रकारची उदात्त भावना त्यांची होती. त्यामुळे तर १९४९-५२ या काळात त्यांची वकिली नावारूपाला आली. कराड, सातारा, सांगली या ठिकाणी त्यांच्या वकिलीला लौकिक प्राप्त झाला.

राजकीय वाटचाल :

खऱ्या अर्थाने आनंदराव काकांची राजकीय सुरुवात १९४२ साली जिल्हा लोकल बोर्डच्या निवडणुकीपासून झाली. महाराष्ट्राच्या राजकारणाबाबत काका आवेशाने बोलत. त्यांचे सहकारी त्यांना ''महाराष्ट्राच्या राजकारणात सातारच्या लोकांचा सवता सुभा कशाला हवा ? असे विचारत तेव्हा ते त्यांना सांगत की, हे विचारण्यापूर्वी शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा उठाव साताऱ्यातून का केला याचा विचार करा ?''[३१] असा स्पष्टवक्तेपणा त्यांच्यात होता.

१९४७-४८ साली इंदूर संस्थान मध्यभारतात विलिन झाले. ''के.सरदार वल्लभभाई पटेल यांनी आनंदरावकाकांच्या कामातील तडफ जाणून घेतली. त्यामुळे त्यांनी आनंदराव चव्हाण यांची मेटकॉफ हाऊस, न्यू दिल्ली येथे आय.ए.एस. साठी निवड केली.''[३२] मेटकॉफ हाऊसचे सी.सी. देसाई हे प्रिन्सिपल होते. त्यांनी काकांना सल्ला दिला, आपण एम्.ए., एल्एल्.एम्. आहात तर परदेश नोकरीसाठी प्रयत्न करावा. यावेळी त्यांना महाराष्ट्रातून परवाना मिळाला नसल्याने त्यांना या नोकरीसाठी प्रयत्न करता आला नाही.

आय.ए.एस. प्रशिक्षणासाठी विविध संस्थानातून १६ प्रतिनिधी निवडण्यात आलेले होते. यामध्ये इंदूर मधून आनंदराव चव्हाण, ग्वाल्हेरमधून संभाजीराव राणे आणि इतर सदस्य होते. या सर्व प्रतिनिधीना प्रशिक्षणासाठी दिल्लीला पाठविण्यात आले. प्रशिक्षण कालावधीत अनेक स्नेही निर्माण झाले. त्यातीलच एक त्यांचे मित्र

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

संभाजीराव राणे हे होत. ''इंदूर आणि ग्वाल्हेरमध्ये ऐतिहासिक बेबनाव असला तरी ते कधीही आपल्या वर्तणात वितुष्ट किंवा दुजाभाव दाखवत नसत.''[३३] काकांच्या सहकाऱ्यांना काका इंदूरपेक्षा ग्वाल्हेरला यावेत असे वाटत होते. परंतु काकांनी इंदूर संस्थानामध्येच नोकरी केली. कारण इंदूर काकांना पुण्यासारखे वाटत होते. महाराज तुकोजी होळकर यांच्याबद्दल आदर होता. त्यामुळे त्यानी इंदूरमध्ये नोकरी केली. त्यांनी तुकोजी होळकर महाराजांची अखंड सेवा केली.

१९४७ साली मध्यभारतसंघाची निर्मिती झाली. मध्यप्रदेशच्या बाजूची सर्व संस्थानाचे विलिनीकरण मध्यप्रदेशात झाले. मध्यप्रदेशची ग्वाल्हेर ही हिवाळी तर इंदूर ही उन्हाळी राजधानी झाली. आय.ए.एस. चे प्रशिक्षण घेऊन जेंव्हा काका इंदूरला आले तेंव्हा नवीन राजवटीला सुरूवात झाली होती. नवीन चिफ सेक्रेटरी व्ही. विश्वनाथन यांनी निवडक अधिकाऱ्यांना हाताखाली घेऊन २५ संस्थानतील कादगपत्रांचे कामकाज सुरू केले. यामध्ये आनंदरावकाका ही होते. नव्या मध्यप्रदेश राज्यात काकांची कलेक्टर म्हणून निवड करण्यात आली. परंतु ही सरकारी नोकरी त्यांनी नाकारली. माझ्या विद्वत्तेचा ज्ञानाचा फायदा माझ्या सामान्य लोकांसाठी झाला पाहिजे. या उद्देशाने ते स्वगृही परतले. त्यांचे सहकारी त्यांना सांगत की सातारमध्ये वकील जास्त आहेत. तेथे तुमची वकिली कशी चालणार. परंतु काकांच्यात आपल्या भागातील लोकांसाठी, जनतेसाठी आपण काहीतरी केले पहिजे ही प्रेरणा होती.

दिल्लीला आय.ए.एस. प्रशिक्षणासाठी असताना आनंदरावकाका आणि त्यांचे सहकारी संसद पाहण्यासाठी गेले. सर्वजण ही भव्य ऐतिहासिक वास्तू पाहण्यात दंग झाले होते. तेंव्हा काकांची त्याठिकाणी काहीवेळ समाधीच लागली होती. ते डोळे मिटून उभे राहिले होते. मित्रांनी त्यांना हालवून जागे केले. त्यावेळी काका म्हणाले की, ''लोकसभा सदस्य म्हणून मी येथे येणार आहे. इथून मी भाषण देणार

आहे. तेव्हा सर्व लोक त्यांना हसले. लोकसभा सदस्य होण्याची त्यांची मनिषा पुढे पूर्ण ही झाली.''[३४] ते असंभव गोष्टी संभव करण्याचा जसा आशावाद ठेवत असत तसे ते जिद्दीने पूर्णही करत असत. आनंदराव चव्हाण यांच्या राजकीय निवडणूकासंदर्भात खालीलप्रमाणे आढावा घेता येईल.

राजकीय निवडणूका संदर्भात :

निवडणूक वर्ष	पक्ष	उमेदवाराचे नाव	मते	एकूण मते
१९५२	शेकाप	दाजीसाहेब चव्हाण ऊर्फ आनंदराव चव्हाण	-	-
	काँग्रेस	बाळासाहेब देसाई	-	-
१९५७	शेकाप	दाजीसाहेब चव्हाण ऊर्फ आनंदराव चव्हाण	१३२३१०	२३८६५२
	काँग्रेस	स्वामी दयानंद भारती	१०६३४२	-
१९६२	काँग्रेस	दाजीसाहेब चव्हाण ऊर्फ आनंदराव चव्हाण	२१४५५३	३०००९७
	शेकाप	आत्माराम नाना पाटील	६७७७५	
	एसडब्ल्यूए	काशीनाथ राजाराम देशमुख	१०६२६	
	आयएनडी	बापूराव विश्वनाथ बटाणे	७१४३	
१९६७	काँग्रेस	दाजीसाहेब चव्हाण ऊर्फ आनंदराव चव्हाण	२३९३६२	३२०४७६
	शेकाप	डी.के. पाटील	६७९४०	
	आयएनडी	के.एस.कांबळे	१३१७४	
१९७१	काँग्रेस	दाजीसाहेब चव्हाण ऊर्फ आनंदराव चव्हाण	२६३३५६	३०५३०७

निवडणूक वर्ष	पक्ष	उमेदवाराचे नाव	मते	एकूण मते
	शेकाप	व्ही.आर. बरावडे	१९८९३	
	एनसीओ	डी.पी. यादव	१०१२६	
	आयएनडी	व्ही.बी. बटाणे	५५७४	
	आयएनडी	आर.व्ही. साळुंखे	३१८९	
	आयएनडी	जे.डी. वठारे	३१६९	

१९५० मध्ये ना. आनंदराव चव्हाण यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. शेकापमध्येही ते एकनिष्ठ कार्यकर्ते राहिले. १९४२ साली त्यांनी जिल्हा लोकल बोर्डची निवडणूक लढवली. त्यानंतर १० वर्षाने म्हणजे १९५२ साली ते विधानसभेच्या निवडणुकीसाठी उभे राहिले. यावेळी बाळासाहेब देसाई हे प्रतिस्पर्धी होते. बाळासाहेब देसाई हे १२ वर्षे जिल्हाध्यक्ष होते. अशा व्यक्तींच्या विरोधात उभे राहणे हे केवळ नेतृत्त्वगुणामुळेच शक्य आहे. १९५२ ची निवडणूक बाळासाहेब देसाई केवळ ९९ मतांनी विजयी झाले. १९५२ चा आनंदरावसाहेबांचा पराजय हा खरा पराजय नव्हताच. कारण आनंदरावकांकानी अल्पावधीत ही लोकप्रियता मिळवली होती.

१९५४ साली आनंदरावकाका शेकापमध्ये होते. "लेजिलेटिव्ह कौन्सिल नेमण्यात आली होती. या कौन्सिलमध्ये आनंदरावकाकांची महाराष्ट्रातून निवड झाली. मार्च, १९५४ ते १९५६ पर्यंत आनंदरावसाहेब तत्कालीन मुंबई विधानपरिषदेचे सभासद होते."[३६] सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नाकडे, समस्यांकडे ते जाणीवपूर्वक पहात. त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करत असत.

प्रकरण पहिले

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. संस्थाने विलिनीकरण झाले. याचवेळी संयुक्त महाराष्ट्राची मागणी पुढे आली. मुंबईसह महाराष्ट्र झाला पाहिजे असे सर्व महाराष्ट्राला अपेक्षित होते. महाराष्ट्रातील छोट्या-मोठ्या संघटनांनी ही मागणी केंद्रसरकारकडे केली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये आनंदराव चव्हाण व शेकापचा सक्रीय सहभाग होता. "१९५६ साली आनंदराव काकांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रीय सहभागी झाले."[३७] १ मे, १९६० रोजी महाराष्ट्रातील लोकांची इच्छा पूर्ण झाली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर शेकापचे महत्त्व कमी झाले. यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील विद्वत्तापूर्ण लोकांनी संघटीत झाले पाहिजे असे आवाहन केले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी समाजवादी पक्षातील तसेच शेकापतील महनीय व्यक्ती काँग्रेसमध्ये आल्या. १९६० मध्ये आनंदराव काका ही यावेळी शेकापतून काँग्रेसमध्ये गेले.

१९५७ ची लोकसभा निवडणूक - शेतकरी कामगार पक्षाच्या कार्याला प्रारंभ करून त्यांनी १९५७ ची लोकसभा निवडणूक स्वामी रामानंद भारती यांच्या विरोधात लढवली. या निवडणूकीत ते कराड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करत होते. "१९५७ ची लोकसभा निवडणुकीचे एकूण मतदान २३८६५२ एवढे झाले होते. स्वामी रामानंद भारती यांना १०६३४२ मते मिळाली तर आनंदरावकाकांना १३२३१० मतदान झाले. आनंदरावकाका शेकापचे उमेदवार म्हणून लोकसभेत निवडून गेले."[३८] डाव्या विचाराने वाटचाल करणारे व सामान्य जनतेविषयी आस्था असणारे हे नेतृत्त्व होते. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराला साथ देऊन ते काँग्रेसमध्ये आले. १९५७-१९६० पर्यंत आनंदरावकाका शेकापचे प्रतिनिधीत्व लोकसभेत करत होते.

१९६० मध्ये आनंदरावकाका यांनी काँग्रेस प्रवेश केला. मा. यशवंतराव चव्हाण आणि आनंदरावकाका यांच्यात विद्यार्थीदशेपासूनच स्नेहसंबंध होते. ''आनंदरावकाका स्वत: बुद्धिमान व परिश्रमी विद्यार्थी होते. त्यामुळे त्यांनी आपले विद्यार्थीजीवन यशस्वरित्या घालविले होते.''[३९] तत्कालीन महाराष्ट्रात त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांना मानणारा समाज होता. त्यांच्या शब्दाला समाजात महत्त्व होते. अशी महत्त्वाचे लोक पुढे काँग्रेसमध्ये गेली.

ना. आनंदराव चव्हाण यांनी १९६२ ची लोकसभा निवडणूक काँग्रेसमधून लढविली. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीवेळी कराड लोकसभा मतदार संघात आनंदराव काका यांचे प्रतिस्पर्धी आत्माराम पाटील (शेकाप), काशिनाथ राजाराम. पाटील (एसडब्ल्यूए), बापूराव विश्वनाथ बटाणे, (आयएनडी) असे उमेदवार होते. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये आनंदरावकाका बहुमताने कराड लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले. या निवडणुकीत एकूण मतदान ३०००९७ ऐवढे झाले. ''आत्माराम पाटील - ६७७७५, काशिनाथ देशमुख - १०६२६, बापूराव बटाणे - ७१४३ अशी मते मिळाली. तर आनंदरावकाका यांना २१४५५३ मतांनी विजयी झाले.''[४०] १९६२ मध्ये काका नेहरूंच्या केंद्रिय मंत्रिमंडळात केंद्रिय उपसंरक्षण मंत्री या पदावर कार्यरत होते. ना. आनंदरावसाहेब यांच्या निवडणूक प्रचार कार्यात श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांनी मोलाचे सहकार्य केले.

१९६२ साली त्यांची नियुक्ती केंद्रिय संरक्षण खात्याच्या उपमंत्रीपदी झाली. या पदावर ते १९६२ ते १९६४ पर्यंत कार्यरत होते. ''१९५४ ते १९६६ दरम्यान काकांनी धान्य व शेती खात्याचे उपमंत्री म्हणून केंद्रिय मंत्रिमंडळात कार्य केले. त्यानंतर काही काळ नियोजन खात्याचे उपमंत्री म्हणून कार्य केले. काही काळ त्यांनी श्रम मंत्रालयाचे उपमंत्रीपदही उपभोगले.''[४१]

१९६७ ची लोकसभा निवडणूक आनंदरावकाकांनी कराड लोकसभा मतदारसंघातून बहुमताने लढविली. या निवडणूकीत प्रतिस्पर्धी म्हणून डी.के. पाटील (शेकाप), के.एस. कांबळे (आयएनडी) होते. १९६७ च्या लोकसभा निवडणुकीचे एकूण मतदान ३२०४७६ एवढे झाले. यामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे डी.के. पाटील यांना ६७९४० तर आयएनडी चे के.एस. कांबळे यांना १३१७४ मते मिळाली व काकांना २३९३६२ ऐवढी मते मिळाली. १९६७ ची लोकसभा निवडणूक ही त्यांनी बहुमताने जिंकली. इंदिराजींच्या केंद्रिय मंत्रिमंडळात त्यांची पेट्रोलियम व रसायन खात्याचे राज्यमंत्री म्हणून नियुक्ती झाली. १९६७ ते १९७० पर्यंत ते या पदावर कार्यरत होते.''[४२]

१९७१ ची लोकसभा निवडणूक – या निवडणूकीत कराड लोकसभा मतदार संघात आनंदरावकाकांचे प्रतिस्पर्धी शेकापचे विठ्ठल रामचंद्र बरावडे, एनसीओ चे ज्ञानदेव पांडूरंग यादव, आयएनडी चे बटाणे बापूराव विश्वनाथ, आयएनडी चे दुसरे उमेदवार रामचंद्र विठोबा साळुंखे, आयएनडी चे तिसरे उमेदवार जैनेंद्र देवाप्पा वठारे हे होते. ही निवडणूक अतिशय चूरशीची होती. या निवडणुकीत ''कराड लोकसभा मतदारसंघाचे एकूण मतदान ३०५३०७ ऐवढे झाले. प्रतिस्पर्धी उमेदवारांना अनुक्रमे विठ्ठल बरावडे – १९८९३, ज्ञानदेव यादव – १०१२६, विश्वनाथ बाटाणे – ५५७४, रामचंद्र साळुंखे – ३१८९, जैनेंद्र वठारे – ३१६९ व आनंदराव चव्हाण यांना – २६३३५६ मते मिळाली. बहुमताने ते विजयी झाले. पं. नेहरू आणि श्रीमती इंदिराजी, लाल बहादूर शास्त्री यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी कार्य केले. १९६७ च्या इंदिरा गांधीजींच्या मंत्रिमंडळात त्यांची कायदा कंपनी खात्याचे राज्यमंत्री म्हणून नियुक्ती झाली.''[४३] काँग्रेसमध्ये त्यांनी एकनिष्ठेने कार्य केले. ऑल इंडिया काँग्रेसची ध्येयधोरणे राबवली. अलौकिक कर्तृत्त्वातूनच चव्हाण घराण्याचा आणि नेहरू–गांधी घराण्याचा संबंध आला.

१९६०-१९७३ पर्यंत ना. आनंदरावकाका यांनी एक काँग्रेसनिष्ठ कार्यकर्ता म्हणून कार्य केले. तत्कालीन भारताचे पंतप्रधान पंडीत नेहरू, लालबहादूर शास्त्री, श्रीमती इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात विविध राजकीय पदे उपभोगली. पक्षाने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडली.

ना. कै. आनंदराव चव्हाण हे माजी केंद्रियमंत्री व थोर विचारवंत होते. १९६० मध्ये त्यांनी काँग्रेस प्रवेश केला. तेंव्हापासून १९७३ पर्यंत ते काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिले. आपल्या पक्षनेतृत्त्वाशी एकनिष्ठ राहिले. महाराष्ट्राच्या संघर्षाच्या काळात त्यांनी पुरोगामी धोरणांचे नेतृत्त्व केले. ''काँग्रेस पक्षातील केंद्रियमंत्री आनंदराव चव्हाण हे इंदिराजींना एकनिष्ठ पाठिंबा देणारे महाराष्ट्रातील एकमेव नेते होते.''[४४]

ना.कै. आनंदरावकाकांचा स्वभाव, मनमिळावू, भावनाप्रदान होता. त्यांची वाणी रांगडी-मराठमोळी स्वरूपाची होती. कधीही त्यांना आपण केंद्रियमंत्री आहोत, एल्एल्.एम्. आहोत याचा गर्व नव्हता. सामान्य लोकांच्यात ते अगदी सहज मिसळत. ''१९५२ च्या निवडणुकीच्यावेळी पाटण तालुक्यातील बेलवडे या गावातील एका न्हावी समाजातील मुलाने आनंदरावकाकांना आपल्या घरी जेवणासाठी बोलविले. तेंव्हा काका निसंकोच त्यांच्या घरी गेले. त्या मुलाच्या घरातील घोंगडीवर मांडी घालून नाचणीची भाकरी आणि घेवड्याची शेंग आनंदाने खाल्ली. यावरून असे दिसते की, समाजात मान-प्रतिष्ठा असणारा व्यक्ती, विद्वत्तापूर्ण व्यक्ति ऐवढ्या सामान्य जनसमुदायात जाऊन मिसळतो. सामान्य जनतेची अगदी नावानीशी विचारपूस करतो असे गुण दुर्मिळ नेतृत्त्वामध्येच दिसून येतात.''[४५]

''मंत्री म्हणून प्रतिष्ठेच्या बुरख्यात राहणे, अधिकाराच्या धुंदीत आपल्या भोवती जनसमुदाय जमा करणे, मोठेपणाचा देखावा निर्माण करणे, सामान्य व्यक्ति

आणि आपल्यात वेगळेपणा दाखवून एक दरी निर्माण करणे हे त्यांना साफ नामंजूर होते.''[४६] आजच्या राजकीय जीवनात असे नेतृत्त्वगुण मिळणे अशक्य आहे. आज राजकीय नेते आपल्याला विरोध करणाऱ्या व्यक्तींना सत्तेवर येताच नेस्तनाबूत करतात. परंतु आनंदरावकाका यांनी १९५७ ते १९७३ ही आपली राजकीय कारकीर्द जनसामान्यांच्या मनात रूजविली. काकांनी कधीही गटबाजीचे राजकारण केले नाही. तो त्यांचा स्वभावच नव्हता. ते आपल्याला मिळालेल्या सत्तेचा व मोठेपणाचा वापर सामान्य जनतेच्या हितासाठी करत. यावेळी तो आपला राजकीय विरोधक असो अथवा अनुयायी असो विधायक कामासाठी त्यांनी कधीही मागेपुढे पाहिले नाही. लोकांनी आपल्याला विरोध करणे हा त्यांचा हक्क ते समजत असत. लोकांच्या समस्या काय आहेत त्या जाणून घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्याचे ते प्रयत्न करत असत. ''आपल्याला सत्ता मिळते ती समाजाचा विकास करण्यासाठी मग तोच विकास जर राजकीय विरोधक करत असेल तर त्यांना सहाय्यच केले पाहिजे.''[४७] अशी उदात्त स्वरूपाची विचारधारा त्यांची होती. सुडाच्या राजकारणाच्या ते विरोधी होते. ते म्हणत, ''ज्याला समाजाचं काम करावयाचे आहे त्याने 'देगा उसका भला, न देगा उसका भला' या नीतीने वागले पहिजे.''[४८] आजच्या भारतीय राज्य-व्यवस्थेतील नवनेतृत्त्वासाठी काकांचे नेतृत्त्व मार्गदर्शक स्वरूपाचे आहे.

१९७१ पासून आनंदरावकाका तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या मंत्रीमंडळामध्ये कायदा कंपनी खात्याचे राज्यमंत्री होते. ८ जुलै, १९७३ रोजी पदावर असतानाच आंनदरावकाकांचे निधन झाले. मृत्युसमयी कै. आनंदरावकाकांचे वय ५७ वर्षाचे होते. ''तत्कालीन अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी म्हंटल्याप्रमाणे एका कर्तृत्त्ववान व्यक्तिमत्त्वास बहर येत असतानाच ते काळाच्या पडद्याआड लुप्त झाले.''[४९]

सन् १९७२ साली उपेक्षित वर्गासाठी कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या सोसायटीची स्थापना करण्यात आली. या सोसायटीचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी कै. आनंदरावकाका यांनी कार्यवाही केली.

"समाजातील अत्यंत कमी उत्पन्न असलेले हातगाडी, टांगा चालवणारे भाजीपाला, मासळी, दोरखंडे, फळविक्रेते, चर्मकार, सुतार, गवंडी इ. प्रकारचे किरकोळ व्यवसाय करणाऱ्या लोकांना बँकाकडून कर्जपुरवठा योग्यवेळी होत नाही. यासाठी आनंदरावकाका यांनी पुढाकार घेऊन 'बाजारकी लो इन्कम ट्रेडर्स को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, कराड' ही सोसायटी स्थापन केली."[५०] १९७२ साली गरीबी हटाव कार्यक्रमांची सुरूवात काकांनी कराड नगरीत केली.

ब्रिटीश काळात महाराष्ट्रात आपले स्वतंत्र स्वराज्य अभिमानाने स्थापणारे छ. शिवाजी महाराज होते. यांचा पूर्णाकृती पुतळा प्रतापगडावर स्थापन करण्यासाठी नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली 'शिव-स्मारक समिती'ची स्थापना करण्यात आली. या समितीमध्ये माधवराव बागल, नाना पाटील, दत्ता देशमुख, उद्धवराव पाटील, दाजीबा देसाई, व्ही.एन. पाटील, यशवंतराव मोहिते, आत्माराम पाटील, आनंदराव चव्हाण, बापूराव जगताप हे महाराष्ट्रातील नेतेमंडळी होती. छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण तत्कालीन भारताचे पंतप्रधान पंडीत नेहरू यांच्या हस्ते झाले.

विचार आणि वर्तनसेवा, सद्भाव यांच्या संतुलनातून त्यांनी केंद्रसत्तेत आणि जनमाणसात काकांनी आपली एक वेगळी प्रतिमा निर्माण केली. त्यांच्या या संघटनात्मक नेतृत्त्वगुणामुळेच ते १९५७ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत बहुमताने निवडून आले. केंद्रियमंत्री झाल्यानंतर आपल्या कराड लोकसभा मतदारसंघात ते कांही वेळा येऊ शकले नाहीत. अशा अनेक प्रसंगी त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांनी काकांना मोलाची साथ दिली. काकांच्या

निवडणूकीच्या कालावधीत त्यांच्या बरोबर प्रचारास जात असत. ज्या काळात महाराष्ट्रातील स्त्रियांना घराबाहेर पडू दिले जात नव्हते. 'चूल आणि मूल' हेच त्यांचे कार्यक्षेत्र होते. अशा सामाजिक परिस्थितीत एका सामान्य कुटूंबातून त्या बाहेर आल्या. समाजात वावरल्या, खऱ्या अर्थाने श्रीमती प्रेमलाकाकींचे राजकीय पाया यातूनच निर्माण झाला. पश्चिम महाराष्ट्रात अनेक महिला नेतृत्त्व उदयास आली. यामध्ये श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांचे एक आदर्श नेतृत्त्व आहे. या आदर्श, कर्तृत्त्वान नेतृत्त्वाचा जीवनपरिचय आपण पुढील प्रकरणात पहाणार आहोत.

प्रकरण पहिले

संदर्भ ग्रंथ

१) मराठी विश्वकोश : खंड-८

२) भोळे, भास्कर लक्ष्मण : 'राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण,' अशोक पिंपळापुरे, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, जुलै, २००२, पृ.१७०.

३) देशपांडे, श्रीकांत : 'लोकप्रशासन सिद्धांत आणि व्यवहार', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, आवृत्ती १९९४, पृ.१७०.

४) खेकाळे, ना.रा. : 'राजकीय नेतृत्त्व', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९९, पृ.७०.

५) पाटील, ऊर्मिला : राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - एम्.फिल. प्रबंध 'स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील संसदेतील स्त्रियांचे प्रतिनिधीत्व व भूमिका'.

६) कित्ता,

७) कित्ता,

८) कित्ता,

९) कोरगावकर, सुचेता, वास्कर आनंद, माने अच्युत, गवाणकर रोहिणी, पवार डी.यू. : : 'सबला - स्त्री अभ्यास : स्वरूप व दिशा', जी.के. इन्स्टिट्युट, गारगोटी प्रकाशन. पृ.१११.

१०) पाटील, ऊर्मिला : राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - एम्.फिल. प्रबंध 'स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील संसदेतील स्त्रियांचे प्रतिनिधीत्व व भूमिका'.

११) कित्ता, : पृ. ९१.

१२) कित्ता, : पृ. ९१.

१३) कित्ता, : पृ. १३.

१४) कित्ता, : पृ. ४५.

१५) पाटील, डी.एम्. : रामप्रताप साप्ताहिक, ८ जुलै, १९८५, पृ.५.

१६) श्री.चव्हाण, पंजाबराव : मुलाखत, दि. २३ ऑगस्ट, २००७.

१७) श्री.चव्हाण, इंद्रजित : मुलाखत, दि. २५ ऑगस्ट, २००७.

१८) श्री.चव्हाण, पंजाबराव : मुलाखत, दि. २३ ऑगस्ट, २००७.

१९) श्री.चव्हाण, भास्करराव : मुलाखत, दि. ७ ऑक्टोबर, २००७.

२०) दैनिक पुढारी : १९७७, पृ.२.

२१) किरपेकर, उदय : दैनिक ऐक्य, २ फेब्रुवारी, १९७७.

२२) लोटांगण वृत्तपत्र, : ८ जुलै, १९८२, पृ.४.

२३) श्री.चव्हाण, पंजाबराव : मुलाखत, दि. २३ ऑगस्ट, २००७.

२४) राणे, संभाजीरव : दैनिक पुढारी, १९७३, पृ.२.

२५) श्री.चव्हाण, पंजाबराव : मुलाखत, दि. २३ ऑगस्ट, २००७.

२६) श्री.शेरेकर, बाळासाहेब : मुलाखत, दि. १२ ऑक्टोबर, २००७.

२७) शिंदे, भास्करराव : लोटांगण वृत्तपत्र, ८ जुलै, १९८३, पृ.४.

२८) पाटील, डी.एम्. : रामप्रताप साप्ताहिक, पृ.५.

२९) कित्ता, : पृ. ५.

३०) रामप्रताप साप्ताहिक : पृ. २.

३१) राणे, संभाजीराव : लोटांगण साप्ताहिक, पृ. २.

३२) राणे, संभाजीराव : दैनिक पुढारी, १९७३, पृ. २.

३३) कित्ता, : पृ. २.

३४) कित्ता, : पृ. २.

३५) इंटरनेट

३६) दैनिक पुढारी, : ९ जुलै, १९७३, पृ.२.

३७) श्री.चव्हाण, पंजाबराव : मुलाखत, दि. २३ ऑगस्ट,२००७.

३८) इंटरनेट

३९) कृष्णाकाठ

४०) इंटरनेट

४१) श्री.चव्हाण, पृथ्वीराज : मुलाखत

४२) दैनिक पुढारी : ९ जुलै, १९७३, पृ.१.

४३) इंटरनेट

४४) रामप्रताप साप्ताहिक : ७ डिसेंबर, १९८०, पृ.२.

४५) शिंदे भास्करराव : रामप्रताप साप्ताहिक, १९८०.

४६) पाटील, एच.पी. : रामप्रताप साप्ताहिक, ७ डिसेंबर, १९८० पृ.२.

४७) कित्ता,

४८) रामप्रताप साप्ताहिक

४९) दै. पुढारी : ८ जुलै, १९७३, पृ.२.

५०) कच्छी, युनूस : रामप्रताप साप्ताहिक, ८ जुलै, १९८४.

तत्कालीन केंद्रीय कायदा मंत्री ना. कै. आनंदराव चव्हाण आणि खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



तत्कालीन राष्ट्रपती श्री. गिरी, तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासमवेत
ना. आनंदराव चव्हाण.